खटला दाखल तारीख : ३०/१०/२०१८
खटला फैलावर तारीख: ३०/१०/२०१८
खटला निकाल तारीख : २१/०५/२०२६
कालावधी : व. म. दि.
०७ ०६ २१
निशाणी क्रमांक : **४०/ब**

**भाग अ**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी आर्णी, जि. यवतमाळ यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : विशाल श्रावण धोंडगे)

(सदरचा खटला हा नियमित खटल्याप्रमाणे चालविण्यात आला.)

संक्षिप्त फौजदारी खटला
क्रमांक- ११०२/२०१८

**सरकारतर्फे पोलिस निरीक्षक**
आर्णी पोलिस ठाणे
ता. आर्णी, जि. यवतमाळ. } ... अभियोग पक्ष.

**विरुध्द**

**अंकुश नारायण मोकाडे**, वय– ४८ वर्षे,
रा. बान्शी, ता. पुसद, जि. यवतमाळ. } ............ आरोपी

**दोषारोप :** भा. दं. वि. कलम २७९, ३३८ प्रमाणे.

अभियोग पक्षातर्फे शासकीय अभियोक्ता : श्री आर.पि.गावंडे
आरोपीतर्फे विधिज्ञ : श्री. आर.डी.ढोरे

# न्यायनिर्णय

(दिनांक २१ मे, २०२६ रोजी घोषित)

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १३/०३/२०१८ |
| फिर्याद दाखल केल्याची तारीख | १७/०३/२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | ३०/१०/२०१८ |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | ०८/०३/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ११/०९/२०१९ |
| न्यायनिर्णय करीता प्रकरण ठेवल्याची तारीख | २१/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | २१/०५/२०२६ |
| दोषी व्यक्तीस जेलमध्ये पाठविल्याची तारीख, लागु असल्यास | – |

आरोपीची माहिती

| क्र. | नाव | अटकेची तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख | गुन्ह्याची कलमे | आरोपीस निर्दोष मुक्त केले की सिध्ददोष | दिलेली शिक्षा | संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये पाठविल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंकुश नारायण मोकाडे | ०७/०६/२०१८ | २२/०२/२०१९ | भा.दं.वि. कलम २७९, ३३८ | निर्दोष मुक्त | – | – |

प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २७९, ३३८ अन्वये शिक्षापात्र अपराधाकरिता संपरिक्षा घेण्यात आली.

२. <u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः–</u>

दिनांक १३/०३/२०१८ रोजी दुपारी ०३.०० वाजेच्या सुमारास मौजे आर्णी ते देउरवाडी या सार्वजनिक रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र.एमएच–३७–सी.१६५९ ही बेदरकारपणे हयगयीने चालवून फिर्यादी याचे मोटरसायकल क्र. एमएच–२९–ए.एक्स.५७४९ ला धडक देवुन अपघात केला व त्यामध्ये फिर्यादीला गंभीर दुखापत झाली, वगैरे

मजकूराच्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द गु.र.नं.१६४/२०१८ भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३८ अन्वये नोंदविण्यात आला. तपास अधिकारी यांनी घटनेचा पुढील तपास केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा व जप्ती पंचनामा केला. तपासाअंती आरोपीविरूध्द पुरेसा पुरावा गोळा झाल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपीविरूध्द भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३८ अन्वये शिक्षेस पात्र असणारा दोषारोप (नि.क्र.१४) प्रमाणे नोंदविण्यात आले. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटल्याला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. आरोपीविरुध्द पुरावा अभिलेखावर आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपीचा जबाब नि.३९ वर नोंदविण्यात आला. त्यात त्याने संपूर्ण बचावाचा पवित्रा घेतला.

४. सहाय्यक शासकीय अभियोक्ता व आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला व पुराव्याअंती न्यायनिर्णयाकरिता खालील वादप्रश्न उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देण्यात येतात.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, दिनांक १३/०३/२०१८ रोजी दुपारी ०३.०० वाजेच्या सुमारास मौजे आर्णी ते देउरवाडी या सार्वजनिक रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र.एमएच–३७–सी.१६५९ ही बेदरकारपणे हयगयीने चालवून फिर्यादी यांचे मोटरसायकल क्र. एमएच–२९–ए.एक्स.५७४९ ला धडक देवुन अपघात केला व त्यायोगे भा.दं.वि.कलम २७९ प्रमाणे अपराध केला? | ... नाही. |
| २ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद मोटार सायकल ही सार्वजनिक रस्त्यावर ही बेदरकारपणे हयगयीने चालवून फिर्यादी यांचे मोटरसायकल क्र. एमएच–२९–ए.एक्स.५७४९ ला समोरासमोर धडक देवून त्यांना गंभीर दुखापत होण्यास कारणीभुत झालात व त्यायोगे भा.दं.वि.कलम ३३८ प्रमाणे अपराध केला? | ... नाही. |
| ३ | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

**५.** आरोपीविरुध्द दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे पाच साक्षीदार तपासण्यात आले. तसेच काही कागदोपत्री पुरावे दाखल केले. त्यांचा संदर्भ यापुढे वेळोवेळी घेण्यात येत आहे. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

**भाग क**

साक्षीदारांची यादी.

| अभियोगपक्षाचे साक्षीदार | | |
|---|---|---|
| क्र. | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
| **अ.सा.क्र.१** | जाकीर हारून भातनासे | फिर्यादी |
| **अ.सा.क्र.२** | शेख वकिल शेख गफ्फार | घटनास्थळ पंच |
| **अ.सा.क्र.३** | जाफर हारून भातनासे | साक्षीदार |
| **अ.सा.क्र.४** | आरिफ नसिर भातनासे | साक्षीदार |
| **अ.सा.क्र.५** | शाहरूख शहा लतिफ शहा | घटनास्थळ पंच |
| बचाव पक्षाचे साक्षीदार | | |
| - | - | - |
| न्यायालयाचे साक्षीदार | | |
| - | - | - |

निशाणी क्रमांक दिलेले कागदपत्रांची यादी.

| अभियोगपक्षाची कागदपत्रे | | |
|---|---|---|
| क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
| १. | निशाणी १९/अ.सा.क्र.१ | फिर्याद |
| २. | निशाणी २०/अ.सा.क्र. १ | प्रथम खबरी अहवाल |
| ३. | निशाणी २२/अ.सा.क्र.२ | घटनास्थळ पंचनामा |
| बचाव पक्षाची कागदपत्रे | | |
| – | – | – |

| न्यायालयाची कागदपत्रे | | |
|---|---|---|
| – | – | – |
| आर्टीकल | | |
| – | – | – |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>वादप्रश्न क्रमांक १ व २ करीता</u>:–**

६. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी जाकीर हारून भातनासे (अ.सा.क्र.१) यांनी कथन केले की, ''मी आरोपीला ओळखतो. घटना दोन वर्षापुर्वी देउरवाडी बुटले रोडवर दुपारी ३ ते ४ वाजताचे दरम्यान घडली होती.घटनेचे वेळेस मी माझे मोटरसायकलने माळहिवरा येथुन आर्णी येथे परत येत होतो. मी देउरवाडी पर्यंत पोहोचल्यावर आरोपी बजाज सिटी या मोटरसायकलवरून दारूच्या नशेत निष्काळजीपणे गाडी चालवुन आले व मला समोरून धडक मारली.त्यात माझे उजव्या हाताची करंकळीच्या बाजुचे बोट व उजव्या पायाचे दोन बोट फॅक्चर झाले व ईतर किरकोळ मार लागला. त्यानंतर मला सरकारी दवाखान्यात आर्णी येथे भरती करण्यात आले व त्यानंतर तेथुन यवतमाळ येथे फउके यांचे दवाखान्यात भरती करण्यात आले.त्यानंतर मी पोलीस स्टेशन आर्णी येथे आरोपींविरूध्द निशाणी १९ कडील तक्रार दिली. छापील एफ.आय.आर. निशाणी २० वर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे.'' आरोपीतर्फे प्रस्तुत साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला नाही.

७. पंच शेख वकिल शेख गफ्फार(अ.सा.क्र.२) यांनी कथन केले की, ''पोलिसांनी मलापंच म्हणून काम करण्याकरिता बोलविले होते. पंचनाम्याची कार्यवाही माझेसमक्ष करण्यात आली होती. घटनास्थळ पंचनामा निशाणी २२ प्रमाणे करण्यात आला.''आरोपीतर्फे प्रस्तुत साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला नाही.

८. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार जाफर हारून भातनासे (अ.सा.क्र.३) यांनी कथन केले की, घटना २.५० ते ३ वर्षापुर्वी दुवुरवाडी बुटले जवळ दुपारच्या सुमारास घटली होती. घटनेच्या वेळेस माझा भाउ जाकीर हरून भातमासे हे दुचाकीवरून कलगाव येथुन आर्णी येथे येत होता. त्यावेळेस आरोपी हा दारूच्या नशेत उलट दिशेने गाडी चालवुन जाकीर ला घडक दिली त्यामुळे जाकीरचे उजव्या पायाचे तिन बोट व उजव्या हाताचे एक बोट तुटले होते. घटनेबाबत मला

जाकीरने स्वताहुन सांगीतले. त्या नंतर मी घटनास्थळावर गेलो व जाकीरला दवाखाण्यात आणले व सोबत आरोपीला सुध्दा घेवुन आलो. त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, घटनेच्या वेळी मी घटनास्थळावर हजर नसल्याने घटना प्रत्यक्ष पाहिली नाही. घटनेबाबत मला जाकिर यांनी सांगितले.

९. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार आरिफ नसिर भातनासे (अ.सा.क्र.४)यांनी कथन केले की, घटना दोन वर्षापूर्वी दुपारी ३ ते ४ वाजेच्या सुमारास देवूरवाडी बुटले जवळ घडली होती. घटनेच्या वेळी आरोपी दारूच्या नशेत दुचाकी चालवित होता. त्याने जाकीरच्या दुचाकीला धडक दिली. सदर घटनेत जाकीरच्या पायाचे व हाताचे बोट फ्रॅक्चर झाले. त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, घटनेच्या वेळी मी घटनास्थळावर हजर नसल्याने घटना प्रत्यक्ष पाहिली नाही. घटनेबाबत मला जाकिर यांनी सांगितले.

**१०.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले पंच शाहरूख शहा लतिफ शहा (अ.सा.क्र.४) यांनी अभियोगपक्षाला पुरक साक्ष दिली नाही.

**११**. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.पी.गावंडे यांनी युक्तीवाद केला की, एक पंच फितुर झाला असला तरी फिर्यादी व इतर साक्षीदारांमार्फत घटनाक्रम अभिलेखावर आलेला आहे. तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीवरुन आरोपीने हयगयीने व निष्काळजीपणाने वाहन चालविल्याचे निष्पन्न होत असल्याने त्यास दोषी धरुन जास्तीत जास्त शिक्षा करण्यात यावी.

**१२**. आरोपीच्या वतीने विधीज्ञ श्री. आर.डी.ढोरे यांनी युक्तीवाद केला की, अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीवरुन आरोपीने हयगयीने वाहन चालवुन अपघात केल्याचे दिसुन येत नाही. साक्षीदारांच्या साक्षीमध्ये आरोपीने गुन्हा केल्याचे सिध्द होत नसल्याने आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात यावे.

**१३**. अभिलेखावरील पुरावा व दोन्ही बाजुंकडील युक्तीवाद विचारात घेतला. अभियोगपक्षाने या खटल्याकामी प्रत्यक्षदर्शी स्वतंत्र साक्षीदार, तपास अधिकारी तसेच वैद्यकिय अधिकारी यांची साक्ष नोंदवलेली नाही. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी जाकीर हारून भातनासे (अ.सा.क्र.१) व पंच शेख वकिल शेख गफ्फार (अ.सा.क्र.२) यांची साक्ष नोंदविताना आरोपी किंवा आरोपीचे वकिल हजर असल्याचे अभिलेखावर आलेले नाही. त्यामुळे त्यांची साक्ष विचारात घेण्यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २७३ ची बाधा निर्माण होते. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराच्या साक्षीवरुन आरोपीने हयगयीने तसेच निष्काळजीपणाने

वाहन चालविल्याने अपघात झाल्याचे सिध्द झाले नाही. तसेच अपघाताच्या वेळी आरोपी हाच अपघातग्रस्त वाहन चालवित असल्याचे अभियोगपक्षाने अभिलेखावर आणले नाही. त्यामुळे सदरील खटला पूर्णपणे कोलमडला आहे. आरोपीविरुध्द कोणताही भक्कम व विश्वसनीय पुरावा अभियोगपक्ष अभिलेखावर आणू शकले नाही. फिर्याद दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे स्पष्टीकरण अभिलेखावर आलेले नाही. वर नमुद त्रुटींमुळे वादप्रश्न क्र. १ व २ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्र. ३ करिता:–</u>**

**१४**. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्याने अभियोगपक्ष आरोपीविरूध्दचा दोषारोप सिध्द करू शकला नाही. त्यामुळे आरोपी निश्चितपणे निर्दोष सुटका होण्यास पात्र होत आहे. म्हणून वादप्रश्न ३ चे उत्तर नोंदवितांना मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

**<u>: आ दे श:</u>**

| | |
|---|---|
| १. | आरोपी अंकुश नारायण मोकाडे यास भारतीय दंड संहिता कलम २७९ व ३३८ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत असून त्यास वर नमुद गुन्ह्यातून मुक्त करण्यात येत आहे. |
| ३. | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) प्रमाणे आरोपीने द्यावयाचा रक्कम रुपये १५,०००/– चा जामीन या आदेशापासून पुढील सहा महिन्यांकरीता राहिल. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)

Digitally signed by DHONDAGE VISHAL SHRAVAN
Date: 2026.05.21 17:12:01 +0530

ठिकाण:– आर्णी

दिनांक:– २१/०५/२०२६

**(विशाल श्रावण धोंडगे)**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, आर्णी

| | | |
|---|---|---|
| निकाल सांगितल्याचा दिनांक | : | २१/०५/२०२६ |
| निकाल टंकलिखीत केल्याचा दिनांक | : | २१/०५/२०२६ |
| निकालावर सही केल्याचा दिनांक | : | २१/०५/२०२६ |